





दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ४ जानेवारी २०२५ | अंक २६ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


## सोमवारी ६ जानेवारी रोजी भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक

बीड, दि ३- जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११. ०० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-याविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी, कर्मचा-याविरुध्द भ्रष्टाचारासंबधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीश: उपस्थित राहून लेखी स्वरुपात मांडाव्यात सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी घेतल्या जाणार नाहीत, असे सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निवारण समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## टाइनी चॅम्पियन स्कूलचे वर्धापन दिनानिमित्त



मुंबई येथील प्रतिक्षा नगर मध्ये टाइनी चॅम्पियन स्कूलचे यंदा ११वा वर्धापन दिनानिमित्त सर्व बालक आणि आपले पालक यांचे अभिनंदन करताना, टाइनी चॅम्पियन स्कूल च्या संचालिका सौ वृषाली गणेश वाडकर यांनी परिस्थितीवर मात करून, दहा वर्षे विद्यार्थ्यांना कमीत कमी शुल्कात चांगल्याप्रकारे शिक्षण- खेळणी-शैक्षणिक साहित्य देऊन, पालकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. आणि त्यात त्या यशस्वीही झाल्या आहेत.

म्हणून येत्या 18 जानेवारी 2025 रोजी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी मिळून ११वा स्नेह संमेलन आयोजित करण्यात आला आहे. आपण कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, अशी संचालिका सौ वृषाली गणेश वाडकर यांनी पत्राद्वारे नम्र विनंती केली आहे.

## उमरा येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : पहिल्या महिला शिक्षिका, समाजसुधारक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उमरा ग्रामपंचायत येथे महिला बचत गटाच्या वतीने साजरी करण्यात आली.

प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला उपस्थित बचत गटाच्या महिलांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.ग्रामपंचायत येथे उपस्थित पदाधिकारी-कर्मचारी यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून वंदन केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सचिन पाटील सिरसाट,शंकरराव पांचाळ महिला बचत गटाच्या रेणुका जाधव,विमल सिरसाट, वंदनाबाई वाघमारे,शालुबाई पट्टेकर, शोभा सिरसाट ग्रामपंचायत लिपिक मुबीन शेख आदी उपस्थित होते.

# लोकवर्गणीतून देशमुख कुटुंबाला ४४,१३,४८८ रुपयांची मदत



बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. या हत्येच्या घटनेला आता जवळपास २५ दिवसांचा कालावधी लोटला आहे. तरीही या प्रकरणातील काही आरोपी अद्यापही फरार आहे. त्यांचा शोध सुरु आहे. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड याला अटक करण्यात आली आहे. त्याला १४ दिवसांची सीआयडी कोठडी बजावण्यात आली आहे. या प्रकरणी सीआयडीचा विविध पथकांच्या माध्यमातून तपास सुरु आहे. ही घटना प्रचंड भयंकर आहे. या घटनेमुळे संपूर्ण राज्य हादरलं आहे. संतोष देशमुख यांचे अत्यंत हाल करुन त्यांना संपवलं आहे. त्यामुळे या घटनेविरोधात नागरिकांमध्ये रोष आहे. या घटनेनंतर नागरिकांकडून लोकवर्गणी काढून देशमुख यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत केली जात आहे. माजलगावचे राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंके यांनी याबाबत म हत्त्वाची माहिती दिली आहे. ङ्माजलगाव मतदारसंघाच्या वतीने मृतक संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना एक मदत म्हणून ४४ लाख १३ हजार ४८८ रुपये जमा करून दिले आहेत. अजून तीन ते चार दिवसांमध्ये लोक निधी गोळा करत आहेत. ते झाले की आम्ही आणून देणार आहोत, अशी माहिती प्रकाश सोळंके यांनी दिली.आरोपींना अजूनही अटक झालेली नाही हे दुर्दैवी आहे. तसेच पोलीस यंत्रणा आणि तपास करणा-या यंत्रणालाचं हे अपयश आहे असं मी मानतो. उद्या मी मुंबईला जाऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कानावर देखील हा सगळा वृत्तांत घालणार आहे. दुर्दैवी आहे, बीड जिल्ह्यामधील पोलीस यंत्रणा संबंध उलटून गेलेली आहे, असं प्रकाश सोळंके म्हणाले.नवीन एसपी आल्याने शिस्तीचं वातावरणदोषी पोलीस कर्मचारी आणि अधिकार्यांची जिल्ह्यातून हकालपट्टी झाली पाहिजे, अशी आम्ही म ागणी करणार आहोत, असं प्रकाश सोळंके म्हणाले. निश्चितपणाने नवीन एसपी आल्याने एक शिस्तीचं वातावरण तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यांचा तसा प्रयत्न चालू आहे. सर्वांनी त्यांना सहकारी केलं पाहिजे. एका दिवसामध्ये काही बदल होत नसतो. गेल्या अनेक वर्षांपासून लागलेली कीड आहे. ही कीड काढायची असेल तर काही कालावधी त्यांना द्यावा लागेल. वेळोवेळी या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या संपर्कात राहून या तपासात वेग मिळावा असा आमचा प्रयत्न आहे, असं प्रकाश सोळंके म्हणाले.

### तोपर्यंत धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाहून दूर करावं

या या प्रकरणात प्रामुख्याने दोन प्रमुख मागण्या आहेत. आरोपींना फाशीची शिक्षा होत नाही तोपर्यंत धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाहून दूर करावं आणि या जिल्ह्याचा पालकमंत्री पद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे घ्यावं. जेणेकरून या जिल्ह्यामध्ये गुंडगिरी, अवैध धंदे यांचं थैमान आहे, त्यांची मुळं जर उखाडून काढायची असतील तर तिथे कणखर म ाणूस पालकमंत्री झाला पाहिजे. ही आमची स्पष्ट भूमिका आहे अशी भूमिका प्रकाश सोळंके यांनी मांडली.

## सोमवारी लोकशाही दिन

बीड, दि. ३ : जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आला आहे.लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिस-या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत.

*******

## शांताई अर्बन मध्ये ज्ञानज्योती सावित्री बाई फुले ची जयंती साजरी




बीड:-भारतातील पहिल्या शिक्षिका,मुख्याध्यापिका,स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या,विद्येची जननी, व समस्त स्त्रियांना शिक्षणाची वाट दाखवणा-या, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी ॲड. सारिका जोशी मॅडम आणि समाजसेविका सानप मॅडम यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली चूल आणि मूल ही प्रथा संपुवन आज ची स्त्री सक्षम बनण्यात फार मोलाचा वाटा सावित्री बाई फुले चां आहे असे मत शांताई अर्बन चे अध्यक्ष डॉ. डी बी शिंदे सर यांनी व्यक्त केले शांताई अर्बन कडून स्त्री शक्तीचां सन्मान केला जातो असे मत सानप मॅडम यांनी मांडले ॲड. जोशी मॅडम बोलताना असे म्हणाले मी शांताई अर्बन कडून महिला सक्षमीकरणाचे प्रयत्न केले जातात ही अतिशय कौतुकास्पद गोष्ट आहे शांताई अर्बन च्या पुढील कार्यास त्यानी शूभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थे च्या सचिव शुभांगी शिंदे मॅडम यांनी ॲड. जोशी मॅडम व सानप मॅडम यांचा शाल श्रीफळ देवून सत्कार केला सर्व कर्मचारी पिगमि एजंट खातेदार व हितचिंतक यांनी ही सावित्री बाई फुले ना विनम्र अभिवादन केले.....

## देशमुख हत्याकांड: खा.सोनवणेंनी ठोठावला मानव अधिकार आयोगाचा दरवाजा दिल्लीत प्रियांक क्रानूनगोंची घेतली भेट



बीड: मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येला २५ दिवस उलटले तरी अद्याप मुख्य आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. दरम्यान, संतोष देशमुख यांचा खून आणि त्यांच्या देहाची केलेली विटंबना ही शरमेची बाब आहे. यामुळे राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने यात स्वतंत्रपणे चौकशी करावी, असे निवेदन खा.बजरंग सोनवणे यांनी आयोगाचे सदस्य प्रियांक क्रानूनगो यांना भेटून दिले आहे.दि.९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्याचे समजल्यानंतर सर्वात पहिल्यांदा संतोष देशमुख यांचा जीव वाचावा, यासाठी खा.सोनवणे यांनी पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्याशी संपर्क केला. दरम्यान, त्यांनी फोन घेणे टाळले. शिवाय केज पोलीसांनी देखील हे प्रकरण गांभिर्याने घेतले नाही. परिणामी, या कालावधीत संतोष देशमुख यांचा मानसिक व शारीरिक छळ करुन हत्या झाली. पोलीसांनी वेळेत सुत्र फिरविले असते तर कदाचित स्व. संतोष देशमुख यांचा जीव वाचलाही असता. दरम्यान, त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. संतोष देशमुख यांना इतक्या वाईटपध्दतीने मारहाण केली की शरिरावर जागा देखील शिल्लक नव्हती. त्यांच्या देहाला चटके देखील देण्यात आले. शिवाय शवाची विटंबना देखील करण्यात आली. इतक्या अमानुषपध्दतीने मारहाण झाल्याच्या घटनेने राज्यात खळबळ उडालेली आहे. दि.९ डिसेंबर रोजी हत्या झालेली असून यातील चार आरोपी अटक आहेत तर ३ अद्याप फरार आहेत. सदरील प्रकरणात राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने दखल घेऊन स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करून तपास करावा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी आज दि.३ जानेवारी रोजी दिल्ली येथे मानव अधिकार आयोगाचे प्रियांक क्रानूनगो यांच्याकडे केली आहे. संतोष देशमुख यांच्या खुन्यांना शिक्षा देऊन देशमुख कुटूंबियांना न्याय देण्यासाठी खा.सोनवणे यांनी पहिल्या दिवसांपासून ठोस भुमिका घेतलेली आहे. यासाठी संसदेत आवाज उठविणे, संसदेबाहेर आवाज उठविणे, पोलीस यंत्रणेशी बोलणे आणि कायद्याच्या कसोटीवर तपास करून घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

# स्वस्तात वाळू निर्णय शासनाने गुंडाळला!

## पुन्हा वाळू विक्रीसाठी जुनी पध्दत,कंत्राटदार नियुक्तीचा प्रस्ताव



राज्यात वाळूमाफियांनी हैदोस घालून आपली दहशत निर्माण केली होती. बिनधास्त बेकायदेशीर वाळू उपसा अनेक ठिकाणी सुरू होता आणि तो रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांवर गाडी घालणे, पेटवून देणे, मारहाण करणे, आदी अनेक प्रकार परभणी, नांदेड व राज्यात अनेक ठिकाणी गेल्या काही वर्षांत घडले आहेत. वाळू लिलावाचे कंत्राट मिळविण्यासाठी स्थानिक गावगुंडांचा प्रयत्न असतो व त्यांना राजकीय आशीर्वाद असतो. त्यामुळे लिलाव किंवा निविदा मागविल्यानंतर वाळूमाफियांकडूनच निविदा भरल्या जातात व इतरांना ती भरू दिली जात नाही. लिलावाच्या बोलींमध्येही संगनमत केलेले असते. वाळू लिलावाची कंत्राटे देण्यात महसूल खात्यातील व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांकडूनही बरेच गैरप्रकार केले जातात. त्यामुळे गेल्या दीड-दोन वर्षांपासून शासकीय डेपोतूनच वाळूविक्रीचा निर्णय घेण्यात आला होता. या प्रकारांना आळा घालण्यासाठी राधाकृष्ण विखे-पाटील यांनी महसूल मंत्रीपदाच्या काळात वाळू लिलाव पद्धती बंद करून जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली शासकीय वाळू डेपो सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. वाळूमाफिया किंवा कंत्राटदार पद्धती मोडीत काढून शासनाकडून वाजवी दरानेच वाळू विक्री सुरू केली होती. त्यामुळे वाळू कंत्राटदारांकडून भरमसाट दराने होणाऱ्या वाळूविक्रीलाही आळा बसण्यास मदत झाली होती. मात्र उपसा करून काढली जाणारी सर्व वाळू शासकीय डेपोमध्ये न येता परस्पर बाहेर विकली जाते आणि वाळू डेपोचा व्यवसाय चालविणे, हे सरकारचे कामच नाही, अशी भूमिका महायुती सरकारने घेतली आहे. त्यामुळे आता नवीन वाळू धोरण तयार करण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे सादरीकरण झाल्यावर ते जाहीर केले जाणार आहे, असे उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले. शासनाचे नवीन वाळू धोरण लवकरच जाहीर करण्यात येईल. सध्याची शासकीय डेपो पद्धती बंद करून कंत्राटदारांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव आहे. यासंदर्भात जनतेकडून व इतरांकडून सूचना व हरकती मागविल्या जातील व त्यानंतरच निर्णय घेतला जाईल

## सं पा द की य

# पत्रकार देखील माणूसच

६ जानेवारी पत्रकार दिन निमित्त लेख

पत्रकार हा समाजाचा चौथा स्तंभ. पत्रकार म्हणजे चौकस व अभ्यासू प्रवृत्तीचा निष्पक्षपाती प्रतिभावंत निर्भिड माणूस यासह अनेक गुळगुळीत शब्दात पत्रकारांविषयी ब-याच वेळा स्तुतीसुमनांचा वर्षावही केला जातो. ठराविक वृतपत्रे सोडली तर बाकी वृत्तपत्रे आपल्या पत्रकारांना मानधन देत नाहीत, उलट त्यांच्यांकडे सातत्याने जाहिरातींचा तगादा संपादकांकडून लावला जातो. पत्रकार दिनानिमित्त काही जाणकार समाज बांधवांकडून सन्मान सत्कार सुध्दा केला जातो. अर्थात समाजातील अनेक कर्तृत्ववान घटकांचा विशेष दिवशी आपण सन्मा करीत असतो. पत्रकार हा समाजाचा महत्त्वाचा घटक असून पत्रकारांचा यथोचित सन्मान केला जाणे अपेक्षित आहे. पत्रकाराने दिलेल्या बातमीचे गांभिर्य लक्षात न घेता त्याला धमावणे, शिवराळ भाषेचा वापर करणे, मारहाण करणे देखील चुकीचे आहे. कारण पत्रकार हा सुध्दा माणूसच आहे. शासनाने देखील पत्रकारांचे गार्हाणे कधी ऐकून घेणे अपेक्षित आहे.

खरंतर सत्ता परिवर्तन घडवून आणण्याची पत्रकारांच्या लेखणीमध्ये क्षमता आहे हे देखील सत्ताधा-यांसह राजकीय पंडितांनी विसरता कामा नये. पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडणे आज गरजेचे आहे. पत्रकारांच्या मागण्या व समस्यांबाबत केवळ अधिस्विकृत पत्रकारांचा विचार न करता शासनाकडून मिळणा□्या सवलतींचा सरसकट पत्रकारांना लाभ व्हायला हवा. त्यांच्या समस्या शासन दरबारी पोहचाव्यात या हेतून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दीक्षाभूमी ते मंत्रालय २८ जुलै ते २० ऑगस्ट या दरम्यान मपत्रकार संवाद यात्राफ काढली. या संवाद यात्रेत महाराष्ट्रातून हजारो पत्रकार सहभागी झालेत. पत्रकार संवाद यात्रेचा समारोप २० ऑगस्ट रोजी मुंबईच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात संपन्न झाला. यावेळी मुंबईचे पालक मंत्री मंगलप्रभात लोढा, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील तसेच आमदार पंकजा मुंडे उपस्थित होते. पत्रकारांच्या मागण्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पर्यंत पोहचवून आठ-दहा दिवसात याविषयावर निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री मंगलप्रभात लोढा व चंद्रकांत पाटील यांनी दिले.

पाचोरा येथील पत्रकार संदिप महाजन यांना गेल्यावर्षी ९ ऑगस्ट रोजी दुपारी नगरपालिकेसमोर तोंडावर रुमाल टाकून त्यांना खाली पाडून काही अज्ञात व्यक्तींनी मारहाण केल्याची घटना घडली. अशा भ्याड हल्लूयाचा निषेध करावा तेवढा कमीच असतो.

आपल्या आजूबाजूला जेव्हा एखादी चांगली-वाईट तसेच वेगळी घटना घडते तेव्हा आपल्याला प्रथम पत्रकाराचे स्मरण होत असते. कारण पत्रकार समाजाचा आरसा असतो. समाजातील प्रत्येक घडामोडींकडे त्याचे बारकाईने लक्ष असते. समाजाला त्याच्याकडून खूप आशा-अपेक्षा असतात. पण तो देखील माणूसच असतो ना! त्यालाही संसार प्रपंच असतो, त्याचबरोबर उदरनिर्वाहकरीता, पोटाची खडगी भरण्यासाठी त्यालाही धडपड करावी लागत असते. उत्तम पत्रकारितेसाठी पत्रकाराकडे शब्द भांडारासह संबंधित विषयाचे ज्ञान, कौशल्य, समयसुचकता असणे जसे महत्त्वाचे असते तसेच सामाजिक मूल्ये नियम व निर्बंध याबाबतची जाण असणेही तेवढेच जरुरीचे असते.

ब-याच पत्रकारांची उत्तम पत्रकार म्हणून गणना केली जाते. तर काही जण आपल्या पत्रकारितेचा नुसता टेंभा-देखावा मिरवीत असतात. काही फक्त गाडीवर झठएडड लिहून आपला खोटारडा मुखवटा धारण करीत असतात. काही इतरांना ब्लँकमेल करुन चिरीमिरी मिळविण्यात मग्न असतात.

मला देखील स्वतःला एक अनुभव असा आला होता कि १७/१८ वर्षांपूर्वी ज्यावेळी माझ्या वडिलांचे हृदयविकाराने निधन झाले होते.वडिलांची निधनवार्ता घेण्याकरीता ि मी ज्या वृत्तपत्रात पत्रकार म्हणून काम करीत होतो त्या वृत्तपत्राचा एक ज्येष्ठ पत्रकार मित्रॅ माझ्या घरी आला, माझ्याकडून निधनवार्ता घेऊन वडिलांचा पासपोर्ट घेतल्यानंतर त्याने माझ्याकडे पन्नास रुपयांची मागणी केली असता, माझ्याकडे आता पन्नास रुपये नसल्याचे तेव्हा मी त्याला सांगितले. मी देखील एक पत्रकार. माझ्याच सोबत एका वृत्तपत्रात पत्रकार म्हणून काम करणारा ज्येष्ठ मित्र माझ्याचकडून ते ही निधनवार्तासाठी पैशांची मागणी करतोय ! अंर्तमनातून त्याच्याविषयी फार चीड आली. अर्थात मला काय करायचे ते नंतर मी केले अनब १५/२० दिवसानंतर त्या मित्राला वृत्तपत्राकडून स्मितभाषेत प्रेमपत्र येऊन सन्मानपूर्वक हटविण्यात आले. पत्रकारीतेला कलंक लावणारे देखील अनेक जण-चांडाळचौकडी सातत्याने मधूरभाषेतून अथवा ब्लँकमेल करुन पैशांची किंवा पार्टीची मागणी करण्याचे उद्योग करीत असतात. अशा कलंकीत ना लायक पत्रकारांपासून दूर राहिलेले केव्हाही बरे !


# साहेब

मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष युगनायक, युगपुरुष, क्रांतीपुरुष आदरणीय पुरुषोत्तमजी खेडेकर साहेब यांचा जन्म ०४ जानेवारी १९५० रोजी आई राधाबाई व वडील सूर्यभानराव खेडेकर यांच्या पोटी झाला. विदर्भातील जिजाऊंचे माहेर असलेला जिल्हा म्हणजे बुलढाणा जिल्हा या जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील अंत्री खेडेकर या गावी साहेबांचा जन्म झाला. आज साहेबांचा वाढदिवस आणि विशेष बाब म्हणजे ७५ वा वाढदिवस त्यामुळे आज साहेबांचा अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा संपन्न होतो आहे. महाराष्ट्रभरातून, देशभरातून आणि जगभरातून साहेबांवर शुभेच्छांचा वर्षाव होतो आहे ही साहेबांच्या मागील ७५ वर्षातील कार्याची पावतीच म्हणावी लागेल.

०१ सप्टेंबर १९९० रोजी साहेबांनी काही मोजक्या सहका-यांना सोबत घेऊन मराठा सेवा संघ या संघटनेची स्थापना केली. आज ही संघटना चौतीसाव्या वर्षात वाटचाल करत आहे. मागील तेहतीस वर्षात साहेबांनी मराठा सेवा संघाच्या माध्यमातून आपल्या हजारो लाखो सहका-यांना सोबत घेऊन महाराष्ट्र भरात, देशभरात आणि जगभरात केलेले अजस्त्र परिवर्तनवादी काम हीच साहेबांची ओळख झालेली आहे. खेडेकर साहेब आणि मराठा सेवा संघ हे नाव माहीत नाही अशी व्यक्ती आज सापडणार नाही.

प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे किंवा असाध्य ते साध्य करिता सायास कारण अभ्यास तुका म्हणे या जगद्गुरु तुकोबारायांच्या संतवचनाप्रमाणे अवघड काम हाती घेणे आणि प्रयत्नाची पराकाष्ठा करून ते तडीस घेऊन जाणे हा साहेबांचा स्वभाव याची प्रचिती मागच्या चाळीस वर्षांमध्ये अनेक वेळा आलेली आहे. तसे पाहता मराठा समाजाला संघटित करणे हे सर्वात अवघड काम. आणि अवघड काम लिलया पार पाडणे हा साहेबांचा स्वभाव. साहेब सोपे काम करतच नाहीत. आपण आपल्या समाजाचा आरसा बनलं पाहिजे आणि आपल्या समाजाचा वारसा समाजासमोर आणला पाहिजे हे उद्दिष्ट सोबत घेऊन साहेबांनी मराठा तीतूका मेळवावा गुणदोषांसह स्विकारावा हे ब्रीद डोळ्यासमोर ठेवून समाजमनाची नांगरणी केली. मराठा शब्द राष्ट्रगीतात आहे, इतिहासात आहे, शिक्षणात आहे, समाजात आहे आणि जगभरात पोहोचलेला आहे. शिवाजी महाराजांच्या काळापासून तर सर्वच धर्म जातीतील मुसलमान, महार, मांग, कुंभार, सुतार, लोहार, न्हावी, धनगर, माळी, मेहतर, कायस्थ, ब्राह्मण, धोबी, कुणबी, अशी अठरापगड जाती धर्मांचे लोक छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात मावळे म्हणून लढले या सर्वांनाच इतिहासात मराठा म्हटले जाते. याचा अर्थ मराठा हा शब्द सर्व समावेशक आहे आणि या सर्वांचा ऐतिहासिक वारसा समान आहे. महात्मा जोतिबा फुले, महाराज सयाजीराव गायकवाड, विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी सर्वच बहुजन समाजास मराठा म्हटले आहे. त्यामुळे हा इतिहास डोळ्यासमोर ठेवून साहेबांनी मराठा सेवा संघाच्या आंदोलन व प्रबोधनाच्या माध्यमातून मराठा बहुजन, मराठा मुस्लिम यांच्यातील दरी कमी केली. फोडा आणि राज्य करा या कपटनीतीला साहेबांनी पुरेपूर ओळखलं होतं. सकल बहुजन समाज या कपटनीतीचा बळी ठरतोय हेही साहेबांच्या लक्षात आलं होतं. त्यामुळे साहेबांनी मराठा बहुजन समाजाच्या मनाची मशागत करून त्या मनात बहुजन महापुरुषांच्या विचारांची पेरणी करून महाराष्ट्राच्या भाळी लागलेला दंगलीचा कलंक पुसून काढला. फोडा आणि राज्य करा या कपटनीतीला पायबंध घातला. मराठा सेवा संघ व समविचारी संघटनांच्या प्रबोधनामुळे महाराष्ट्रातील दंगली कमी झाल्या असा निर्वाळाच राष्ट्रीय व राज्यातील गुप्तचर संस्थांनी दिला आहे.

साहेबांनी मराठा बहुजन तरुण तरुणींचे प्रबोधन केले. ज्यांच्या हातात कायम लाठ्या-काठ्या, दगड-गोटे, शस्त्रे देऊन दंगली घडविल्या जायच्या त्यांच्या हातात साहेबांनी पुस्तके दिली. त्यांना कस्टडीकडून स्टडीकडे वळवले. बळीराजा, बुद्ध, वर्धमान महावीर, नामदेव, तुकाराम, शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर, निवृत्ती, जिजाऊ, ताराराणी, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, फातिमाबी शेख यांचा समृद्ध आणि सत्य इतिहास तरुणाईपर्यंत पोहोचवला. त्यामुळे तरुणाईला आपले खरे आयडॉल समजले, खरे मित्र कोण ? खरे शत्रू कोण? हे समजले. पुस्तक वाचा मस्तक सुधारेल, सुधारलेले मस्तक कोणाचे हस्तक होत नाही आणि चुकीच्या ठिकाणी नतमस्तक होत नाही हा विचार साहेबांनी समाजमनात रुजवला. डोक्याच्या मालिशपासून बुटाच्या पॉलीशपर्यंत कुठलाही व्यवसाय करून कष्टाने व इमानदारीने पैसा कमवा असा विचार साहेबांनी दिला. आज ही तरुणाई उद्योग-व्यवसायासोबतच एमपीएससी, यूपीएससी, आयएफएस, आयआरएस अशा वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून स्थिरस्थावर होत आहे हे साहेबांच्या प्रयत्नांचे यश आहे.



सत्य असत्याशी मन केले ग्वाही मानियेले नाही बहुमता या संत तुकारामांच्या संतवचनाप्रमाणे कोण काय म्हणेल वा म्हणतय याचा विचार न करता साहेबांनी कायम सत्याची बाजू घेतली. इतिहासाची चिकित्सा केली. सत्य इतिहास समोर आणला. इतिहासाला लागलेला डाग पुसून काढला. हजारो इतिहास संशोधक, अभ्यासक, लेखक, प्रकाशक, विक्रेते, वाचक, वक्ते, शाहीर, कीर्तनकार, समाजप्रबोधनकार, कलाकार, विचारवंत, व्याख्याते घडवले. त्यांच्या माध्यमातून सत्य इतिहास तळागाळातील समाज घटकापर्यंत पोहोचवला. प्रकाशन संस्थांच्या माध्यमातून कोट्यावधी ग्रंथ, पुस्तके छापली व घराघरात आणि जगभरात पोहोचवली. स्थायी आणि जंगम संपत्तीपेक्षा बौद्धिक संपत्ती कितीतरी पटीने श्रेष्ठ आणि टिकाऊ असते. बौद्धिक संपत्तीने मराठा सेवा संघ ही संघटना सर्वात श्रीमंत बनवण्याचे काम साहेबांनी केले.

मराठा बहुजनांच्या सर्वांगीण विकासासाठी साहेबांनी पंचसुत्री दिली शिक्षणसत्ता, अर्थसत्ता, धर्मसत्ता, राजसत्ता व प्रचार प्रसार माध्यम सत्ता आपल्या ताब्यात असाव्यात आणि त्या ताब्यात घेण्यासाठी तरुणांनी आवश्यक योग्यता, पात्रता आपल्यामध्ये निर्माण कराव्यात त्याशिवाय आपला उद्धार नाही अशा प्रकारचा आग्रह सुरुवातीपासून आजपर्यंत साहेबांनी धरलेला आहे.

मराठा सेवा संघाची स्थापना करत असताना साहेबांनी प्रेरणास्थान म्हणून जिजाऊंना डोळ्यासमोर ठेवले. जिजाऊ या केवळ शिवरायांच्या आई होत्या म्हणून नव्हे तर काळाच्याही पुढे जाऊन सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय अशा विविध क्षेत्रातील कृतिशील सुधारक व एक कणखर महिला म्हणून जिजाऊंची ओळख आहे. जगातील प्रत्येक स्त्रीचे प्रतिनिधित्व जिजाऊ करतात. क्षेत्र कुठलेही असो त्या क्षेत्रातील महिलेसाठी जिजाऊ ऊर्जास्त्रोत आहेत, प्रेरणास्त्रोत आहेत. त्यामुळे मराठा सेवा संघाने जिजाऊंना प्रेरणास्थान मानलं आणि जय जिजाऊ हे अभिवादन समाजामध्ये रुजवलं. जिजाऊंची प्रतिमा तयार केली, तिला सरकार मान्यता आणि लोकमान्यता मिळवली आणि ती प्रतिमा मंत्रालयापर्यंत स्थापित केली. जिजाऊंचे माहेर, जन्म स्थान मातृतिर्थ सिंदखेडराजा या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये जिजाऊ जन्मोत्सवाची सुरुवात केली. आज संपूर्ण जगाला हेवा वाटावा अशा जिजाऊसृष्टीचे भव्य आणि दिव्य स्वरूपात निर्माण सिंदखेडराजा या ठिकाणी होत आहे. लाखो लोक दरवर्षी त्या ठिकाणी येतात, जिजाऊंच्या चरणी नतमस्तक होतात, ती पावन माती आपल्या कपाळी लावतात, ऊर्जा, प्रेरणा आणि विचारांसोबतच कोट्यावधी रुपयांची पुस्तके घेऊन परत जातात. जगातले एकमेव असे ठिकाण आहे की ज्या ठिकाणी स्वखर्चाने लोक येतात आणि स्वखर्चाने कोट्यावधी रुपयांची पुस्तकं सोबत घेऊन जातात.

मराठा सेवा संघ ही परिवर्तनवादी सामाजिक चळवळ साहेबांनी सुरू केली आणि कोणत्याही परिवर्तनवादी चळवळीचे व्यापक मानवकल्याण हे अंतिम उद्दिष्ट असायला हवे. समाज ज्ञाननिष्ठ व्हावा, प्रगत व सर्वश्रेष्ठ व्हावा, त्याने विवेकपूर्ण जीवन जगावे, वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारावा, अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड, अनिष्ट, चुकीच्या प्रथा-परंपरा, चाली-रीती यांना मूठमाती द्यावी, पुरुषांमधील व्यसनाधीनता व भांडणे आणि महिलांमधील उपवास-तापास व्रतवैकल्य, कर्मकांड नाहीसे व्हावेत यासाठी मराठा सेवा संघाच्या माध्यमातून साहेबांनी जाणीव जागृती केली. समाजप्रबोधनासाठी लोकजागृतीसाठी लोकशिक्षणासाठी मराठा सेवा संघाचे मुखपत्र मराठामार्ग हे मासिक सुरू केले. त्याचबरोबर साप्ताहिक शिवधर्म, साप्ताहिक संभाजी ब्रिगेड, पाक्षिक जिजाऊ संदेश, त्रैमासिक तुकोबावाणी, शिवधर्म दिनदर्शिका अशा नियतकालिकांच्या माध्यमातून अखंडितपणे प्रबोधनाचे काम सुरू आहे.

मागच्या अनेक वर्षांमध्ये महाराष्ट्रात आणि देशभरात गाजत असलेला मराठा आरक्षणाचा प्रश्न, संपूर्ण समाजमन या प्रश्नाने ढवळून निघालेले आहे. परंतु १९९० पासून आजतागायत साहेबांनी व मराठा सेवा संघाने मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करावा आणि मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून घटनात्मकदृष्ट्या, कायदेशीरदृष्ट्या कायम स्वरूपी टिकणारे आरक्षण द्यावे ही मागणी लावून धरली. त्यासाठी साहेबांनी युवराज छत्रपती संभाजी राजेंच्या नेतृत्वात शिव-शाहू आरक्षण यात्राही संपूर्ण महाराष्ट्रभरामध्ये काढली. ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण मिळावं ही प्रथम मागणी मराठा सेवा संघाची आणि साहेबांची होती. कारण जाती अंताची लढाई जिंकण्यासाठी मराठ्यांचे ओबीसीकरण व्हावे अशी ठाम भूमिका साहेबांनी त्याकाळी घेतली होती. आज संपूर्ण मराठा समाजाने एकमुखी ओबीसीतून आरक्षणाची मागणी करून साहेबांची आणि मराठा सेवा संघाची भूमिका योग्य होती यावर शिक्कामोर्तब केले आहे.

साहेबांनी मराठा सेवा संघाच्या माध्यमातून वारंवार सरकारकडे आग्रह धरून व पाठपुरावा करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा वाद मिटवला. अनेक इतिहास संशोधक, इतिहास लेखक, अभ्यासक यांना सोबत घेऊन पुराव्यानिशी सरकारच्या लक्षात आणून दिले की छत्रपती शिवाजी महाराजांची जन्म तारीख १९ फेब्रुवारी १६३० आहे. सबळ पुराव्यांच्या आधारे सरकारने याला मान्यता दिली. लोकमान्यताही मिळाली आणि शिवरायांच्या जयंतीचा वाद मिटला. महाराष्ट्रभरात, देशभरात आणि जगभरात एकाच दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी होते हे साहेबांचं आणि मराठा सेवा संघाचं महत्त्वाच यश आहे. त्याचबरोबर जिजाऊ वंदना दिली, एक मराठा लाख मराठा, तुमचं आमचं नातं काय जय जिजाऊ जय शिवराय या गगनभेदी घोषणा महाराष्ट्र भरात, देशभरात आणि जगभरात घुमायला लागल्या. जय भवानी जय शिवाजी या एकेरी घोषणा ऐवजी जय जिजाऊ जय शिवराय ही आदर युक्त घोषणा लोकमान्य आणि लोकप्रिय झाली. जिजाऊ जन्मोत्सव, शिवजन्मोत्सव, शंभू जन्मोत्सव, शिवराज्याभिषेकदिन सोहळा अशा प्रकारचे सोहळे मोठ्या थाटात महाराष्ट्रामध्ये आज संपन्न होतात यामध्ये साहेबांचे योगदान हे अनन्यसाधारण आहे.

साहेबांनी झोपलेल्यांना जागे केले, जे जागे झाले त्यांना उभे केले, जे उभे राहिले त्यांना चालते केले, जे चालते झाले त्यांना धावते केले, जे मुके होते त्यांना बोलते केले, वक्ते केले, प्रवक्ते केले, न लिहिणारे लिहिते केले, संशोधक, लेखक, साहित्यिक, विचारवंत केले शाहीर, कलाकार निर्माण केले आणि सर्वांच्या खांद्यावर सामाजिक परिवर्तनाचे निशाण दिले. आणि या सर्वांना सोबत घेऊन ही सामाजिक परिवर्तनाची लढाई मागील अनेक वर्षांपासून नेटाने पुढे घेऊन जाण्याचे काम साहेबांनी केले. आज सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, जातीय, मीडिया, वैचारिक, वैयक्तिक, कौटुंबिक असे एकही क्षेत्र नाही जेथे मराठा सेवा संघाचा आणि साहेबांचा प्रभाव नाही. लाखो कोट्यावधी लोकांच्या मनामनात मराठा सेवा संघ पोहोचवण्याचं काम साहेबांनी केलं. साहेब लाखो कोट्यावधी लोकांचा ऊर्जास्त्रोत आहेत, प्रेरणास्त्रोत आहेत, योग्य मार्ग, योग्य दिशा दाखवणारे होकायंत्र आहेत. पुरुषोत्तम खेडेकर साहेब व मराठा सेवा संघ एकमेकास पूरक व पर्यायी नावे ठरलेली आहेत. एका नाण्याच्या दोन बाजू जशा वेगळ्या करता येत नाहीत तशी ही दोन नावे वेगळी करता येत नाहीत.

लेकुराचे हित वाहे माऊलीचे चित्त ऐसी कळवळ्याची जाती करी लाभावीन प्रीती या जगद्गुरु तुकारामांच्या संतोक्तीप्रमाणे आजही साहेब सर्व समाजावर लेकरासमान प्रेम करतात. समाजाच्या भल्यासाठी, समाजाच्या हितासाठी आजही तळमळीने रात्रंदिवस राबतात. वयाच्या पंचाहत्तरीतही साहेब मराठा सेवा संघाचे एक पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून आज सुद्धा काम करतात. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये आपलं नाव सुवर्णअक्षरांनी कोरलं जावं एवढं अफाट कार्यकर्तृत्व साहेबांनी निश्चितच उभा केलेलं आहे. आज त्यांचा अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा संपन्न होत आहे. साहेबांना निरोगी दीर्घायुष्य लाभावे हीच सदिच्छा व शुभेच्छा.

ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे
जिल्हाध्यक्ष
मराठा सेवा संघ प्रणित संत
गाडगेबाबा प्रबोधन कक्ष बीड

# वाडब.मय म्हणजे मानवी मनाच्या आंदोलनाचा आलेख संमेलनाध्यक्ष मा. सुरेश पाचकवडे

नागपूर : अक्षरक्रांती फाऊंडेशन व कला गौरव संस्थेच्या संयुक्त विद्यमाने मअक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवाफ्चा उद्घाटन सोहळा म. फुले शिक्षण संस्था सभागृह, रेशिमबाग, नागपूर येथे पाहुण्यांच्या हस्ते थाटात संपन्न झाला. वाडब.मय म्हणजे मनाचा आरसा! मनुष्याच्या वाणीतून, लेखणीतून जो प्रवाही उद्गार निघतो, तो साहित्यात चिरंतन होऊन जातो. साहित्य हे वेदनेच्या गर्भातून जन्माला येते. तो मानवी मनाच्या आंदोलनाचा आलेख असतो. लेखकांनी जीवनदृष्टी देण्यामध्ये लेखनाचा मोठा वाटा उचलावा, असे आवाहन संमेलनाध्यक्ष मा. सुरेश पाचकवडे यांनी केले. आपल्या अवतीभवतीच्या समस्या, प्रश्न, विषयांचे संशोधन करून लेखकांनी लिहिते व्हावे, कवी-लेखकांनी ज्वलंत समस्यांवर व्यक्त व्हावे, असे विचार साहित्य महोत्सवाचे उद्घाटक दैनिक सकाळचे निवासी संपादक मा. प्रमोद काळबांडे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी विशेष अतिथी मा. डॉ. रवींद्र शोभणे यांनी नवोदितांना संबोधताना म्हणाले की, जास्तीत जास्त वाचन व अध्ययन करून सकस साहित्यनिर्मितीचा विडा उचलावा. पत्रकार व समीक्षक मा. डी. बी. जगत्पुरिया यांनी भाषणातून लेखकांना विज्ञानवादी, परिवर्तनकारी साहित्यनिर्मिती करण्याचे आवाहन केले. जपान येथील कादंबरीकार उर्मिला देवेन यांनी विदेशात राहूनही मायमराठीच्या संवर्धनासाठी आम्ही मराठी भाषिक विविध उपक्रम राबवित असल्याचे सांगितले. कला गौरव संस्थेच्या अध्यक्षा डॉ. संगीता बानाईत यांनी साहित्याबरोबरच लोककलेचे संगोपन व्हावे; असे म्हणाल्या. ज्ञानपथ प्रकाशन, संपादक मा. शंकर घोरसे व कार्यकारी संपादक मा. प्रभाकर तांडेकर मप्रदत्तफ यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनाखाली निर्मिलेल्या तसेच देश-विदेशातील साहित्याला समाविष्ट केलेल्या मअक्षरठेवफ या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक आयोजक शंकर घोरसे यांनी केले. उद्घाटन सत्रात विशेष व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यात जलंब (बुलडणा) येथील मंगलाताई घोपे यांचा आदर्श संरपंच म्हणून सत्कार करण्यात आला. वृद्धसेवेकरिता मातोश्री वृद्धाश्रम आदासा येथील मा. प्रदीप चंदनबटवे तसेच कौमार्य चित्रपटाचे गीतकार मा. संजय बंसल, उमरेड व सामाजिक कार्यकर्ते मा.अनंत भारसाकडे नागपूर यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. पुस्तकांचे प्रकाशन : उद्घाटन समारंभात लेखिका उर्मिला देवेन यांच्या मद गेम ऑफ अफेयरफ या कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. मा. मनोज भारशंकर, अबुधाबी, युएई (कवितासंग्रह: मायचा पदर) भाष्य मा. दिपक देशपांडे, परभणी, मा. प्रभाकर तांडेकर मप्रदत्तफ, नागपूर (हायकूसंग्रह–कृतिकाई) भाष्य– प्रा. शैलेश निकोसे, वर्धा. मा. डॉ. संध्या पवार, नागपूर (कवितासंग्रह–शब्द) भाष्य – मा. रेखा दंडिगे, नागपूर, मा. अर्चना धानोरकर, वर्धा (कवितासंग्रह : इंद्रधनू) भाष्य – प्रा. मीनल येवले, प्रा. विनय पाटील, वेलतूर (कवितासंग्रह: निनाद) भाष्य–प्रा. राजेंद्र कांबळे, नागपूर, मा. लीना भुसारी खैरकर, नागपूर (कवितासंग्रह: साज–प्रीतीचा) (चारोळी संग्रह: रसकुंज) भाष्य–मा. मंजूषा कऊटकर, कळमेश्वर मा. गणेश भाकरे, सावनेर (बालकवितासंग्रह: थेंबा थेंबाची कहाणी) मनोगत–मा. गणेश भाकरे, मा. डॉ. स्मिता मेहेत्रे, नागपूर (कवितासंग्रह : निशिगंधाचा दरवळ) (चारोळीसंग्रह :कॅलिडोस्कोप) भाष्य–मा. डॉ. लीना निकम, नागपूर मा. गणेश पांडे, नागपूर (चारोळीसंग्रह – चांदणवेल) भाष्य–वीणा पांडे, नागपूर. अशा अनेक पुस्तकांचे पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशन झाले. काव्यस्पर्धेतील विजेत्या कवी–कवयित्रींना पुरस्कार : अक्षरक्रांती फाउंडेशन द्वारा आयोजित काव्यस्पर्धेतील विजेत्या कवी–कवयित्रींना यावेळी पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यांत प्रथम पुरस्कार–छ. संभाजीनगरचे कवी माणिक सोनवणे यांच्या मपाऊसपाणीफ, द्वितीय पुरस्कार–नागपूरच्या विद्या निनावे यांच्या मवाट पाहतो उंबराफ तर तृतीय पुरस्कार वणीच्या भावना गंगमवार यांच्या मकृष्णमेघफ या कवितेला पुरस्कार प्रदान करण्यात आला. अक्षरक्रांती फाउंडेशन सदस्यांचा सन्मान : यानंतर अक्षरक्रांती फाउंडेशनच्या ज्या सदस्यांची पुस्तके या वर्षात प्रकाशित झाली, त्यांचा सत्कार–सन्मान करण्यात आला. यामध्ये मा. रेखा देशमुख, अमरावती (कथासंग्रह– सोनचाफा),मा. निमा बोडखे, नागपूर (कादंबरी – अनाहिता), मा. रेखा सोनारे, नागपूर (कवितासंग्रह आयुष्याचं पान), मा. सरला कापसे, वर्धा (कवितासंग्रह–गगनभरारी), मा. गणेश भाकरे, सावनेर (बालकवितासंग्रह – ताई माझी आई) मा. ॲड. नीता कचवे, अमरावती (चारोळीसंग्रह– शब्दनीता), मा. सीमा भांदर्गे, अमरावती (बालकवितासंग्रह – धरा वाचवा), मा. अंजली वारकरी, अमरावती (चारोळी संग्रह– मधुगंध), मा. शंकर घोरसे, खापरखेडा (इंग्रजीतील कवितासंग्रह– ज, त्रीशशवे), मा. डॉ. साधना तेलरांधे, नागपूर (कवितासंग्रह – उन्मेष), मा. चरणदास वैरागडे, नागपूर (कवितासंग्रह–नाद पैंजणाचा), मा. डॉ. श्रद्धा वाशिमकर, नागपूर (आठोळीसंग्रह – अंतरंग), मा. कीर्ती लंगडे, कळमेश्वर (कवितासंग्रह–अंतरीची ठेव),मा. प्रा. मोहन काळे, अकोला (कथासंग्रह–पळस फुलला), मा. डॉ. मंदा नांदुरकर, अमरावती (बालकवितासंग्रह – फुलकई), मा. सुचिता कुनघटकर, नागपूर (कवितासंग्रह– कमलस्पर्श), मा. राजू डहाके, नागपूर (कवितासंग्रह–नक्षत्र),मा. डॉ. भारती खापेकर, नागपूर (कवितासंग्रह – प्राजक्त), मा. कीर्ती सेलोकर बालपांडे, नागपूर (कविता–लेखसंग्रह–अंतर्नाद), मा. दीपा काकडे गायकवाड, नागपूर (कवितासंग्रह आकाश कवेत घेतांना), मा. डॉ. लीना निकम, नागपूर (ललित लेखसंग्रह –अवघा ते शकून), मा. सुजाता लोखंडे, नागपूर (इंग्रजी आत्मचरित्र– चू छींीीळपस), मा. अमिता घाटोळ, आकोला (चारोळीसंग्रह–ज्ञानाई सावित्रीमाई फुले) यांचा समावेश होता. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तुत करणारे कलावंत व आयोजनासाठी परिश्रम करणारे कार्यकर्ते यांचाही सत्कार करण्यात आला. कथाकथन सत्र: कथाकथन सत्राचे अध्यक्षपदी आकोटचे सुप्रसिद्ध कथाकार मा. विजय इंगळे पाटील हे होते व तर यात यवतमाळचे कथाकार मा. अ. भा. ठाकुर व अकोल्याच्या प्रा. लता थोरात यात सहभागी झाले होते. सूत्रसंचालन मा. नरेंद्र माहूरतळे यांनी केले तर आभार मा. कीर्ती लंगडे यांनी केले. प्रकट मुलाखत: यात समाजसेविका व प्रयोगशील शिक्षिका डॉ. संध्या पवार (नागपूर) यांची प्रकट मुलाखत आकोट येथील पत्रकार, निवेदक, गायक मा. प्रकाश गायकी यांनी घेतली. यातून गरीब, पीडित, शोषित अशा ४० मुलींना आपली पदरमोड करत आपल्याच घरात ठेवून त्यांचे जीवन घडवणा–या डॉ. संध्या पवार यांना बोलतं केले व त्यांच्या व्यसनमुक्ती, पालकमैत्री यांसंबंधी कार्यालाही उजाळा दिला. सूत्रसंचालन डॉ. लीना निकम यांनी केले व आभार निमा बोडखे यांनी मानले गजल संमेलन: गजलकार व कवी मा. बबन सराडकर यांच्या अध्यक्षतेत गजलसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. गजलकार मा. प्रवीण बोपुलकर (पनवेल), अजीजखान पठाण (नागपूर) हे प्रमुख अतिथी होते. यात महाराष्ट्रातील नामवंत गजलकार उपस्थित होते. त्यांनी आपल्या शब्दफेकीतून रसिकांना खिळवून ठेवले. गजलची गजलीयत काय असते, हेही दिसून आले. सूत्रसंचालन मा. अनंत नांदूरकर मखलीशफ यांनी केले तर आभार मा. प्रसेनजित गायकवाड यांनी मानले. निमंत्रितांचे कविसंमेलन : मूर्तिजापूरचे कवी मा. रवींद्र जवादे हे मनिमंत्रितांचे कविसंमेलनाफ्चे अध्यक्ष होते तर प्रमुख अतिथी मा. मधुकर वडोदे (खामगाव) हे होते. यात कवींनी रसाळ व मधाळ कविता सादर करून कविसंमेलनाची उंची वाढविली. सर्वच प्रकारच्या सरस अशा कवितांमुळे रसिकवर्ग भारावून गेला. सूत्रसंचालन कवी मा. हितेश गोमासे यांनी केले तर कवयित्री मा. ज्योती बन्सोड यांनी आभार मानले. परिसंवाद : मसंतांचा कर्मयोग आणि साहित्यफ यावर परिसंवाद घेण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिका डॉ. शुभदा फडणीस ह्या अध्यक्षस्थानी होत्या तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्याचे गाढे अभ्यासक मा. ज्ञानेश्वर रक्षक व दै. लोकसत्ताचे वरिष्ठ उपसंपादक मा. शफी पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यात डॉ. राजेश मिरगे (अमरावती), डॉ. स्मिता मेहेत्रे (नागपूर) हे प्रमुख वक्ता होते.

# .अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



बीड दि. ३:-अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.सदरील कार्यक्रमासाठी मन्सुरी अन्सार निसार अहमद जि.अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड,मंगेश बबनराव जाधव जिल्हा परिविक्षा अधिकारी, संतोष वारे बाल कल्याण समिती सदस्य, ऍड. सारिका कुलकर्णी बाल न्याय मंडळ सदस्या, बालीका शिंधीकुंमठे शिक्षीका, बडे नितीन,चव्हाण सुनिल,अभिनय सरवदे,शेख रिजवान ,शेख कैफ मुस्तफा आदी उपस्थित होते.


# ५-जानेवारी रोजी भव्य मराठा वधूवर परिचय मेळावा



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड : मराठा वधूवर सूचक मंडळ नांदेडच्या वतीने २१ वा भव्य मराठा वधुवर परिचय मेळावा दिनांक ५-जानेवारी रोजी हनुमान मंदिर मंगल कार्यालय विजयनगर नांदेड येथे संपन्न होणार आहे. मागील २० वर्षापासून मंडळाच्या वतीने अगदी मोफत हा वधूवर परिचय मेळावा घेतला जातो. मराठा समाजातील विवाह इच्छूक वधूवरांना योग्य व अनुरूप असा जोडीदार निवडता यावा याच भूमिकेतून हा परिचय मेळावा प्रतिवर्षी घेतला जातो. यावर्षीचा मेळावा ५- जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.या मेळाव्यात नवनिर्वाचित खासदार, आमदार यांचा हृदय सत्कार मंडळाच्या वतीने करण्यात येणार आहे. मेळाव्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून सर्वपक्षीय नेते, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी आदी गणमान्य मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे. समाजाचा वेळ,पैसा, श्रम वाचावेत हीच प्रमुख भूमिका या मेळाव्याच्या आयोजनाच्या पाठीमागे आहे. मराठा समाजाची सध्याची परिस्थिती पाहता अशा वधूवर परिचय मेळाव्याची समाजाला नितांत गरज आहे. समाजाची ही सध्याची गरज लक्षात घेऊन मागील दोन दशकापासून मराठा वधूवर सूचक मंडळ हा उपक्रम मोफत राबवित आहे.समाजबांधवही यासाठी चांगला प्रतिसाद देत आहेत. विवाह इच्छुक वधूवरांनी व त्यांच्या पालकांनी आपल्या पाल्याच्या परिचयपत्रासह पूर्व नोंदणी हनुमान मंदिर मंगल कार्यालय विजयनगर नांदेड येथे करावी,असे आवाहन मंडळाचे संस्थापक कार्याध्यक्ष संभाजीराव शिंदे,सचिव प्रा.संतोष देवराये,उपाध्यक्ष इंजि.तानाजीराव हुस्सेकर,दिगंबरराव कदम,कोषाध्यक्ष अँड .एल.जी.पूयड, सभासद शिवाजीराव खुडे,सौ. राजश्रीताई हेमंत पाटील सौ कल्पनाताई डोंगळीकर आदींनी केले आहे.

# श्री क्षेत्र नारायण गडाचे मटाधिपती ह भ प गुरुवर्य शिवाजी महाराजांच्या हस्ते मराठा महासंघाच्या दिनदर्शिकाचे प्रकाशन

अखिल भारतीय मराठा महासंघ २०२५ हे वर्ष शतकोत्तर रोप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करत असून त्यानिमित्त अखिल भारतीय मराठा महासंघाने जिल्हा निहाय दिनदर्शिका प्रकाशित करून मराठा महासंघाच्या संत परंपरेचा, आरक्षण लढ्याचा, समाज संघटित करून सामाजिक उत्कर्षाच्या विचारांची रुजवल घराघरात व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणावर दिनदर्शिका मुद्रित केल्या असून त्याचे प्रकाशन गुरुवर्य ह भ प शिवाजी महाराजांच्या हस्ते पहिल्या प्रतीचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मा. गुरुवर्य यांनी मराठा महासंघाच्या कार्याचा उल्लेख करत शतकोत्तर रोप्य महोत्सवी वर्षाची सुरुवात ही आळंदी येथे संत पूजनाने केल्याने या कार्यक्रमाची कौतुक केले. तसेच बीड जिल्हाध्यक्ष गणेश नाईकवाडे




यांनी अखिल भारतीय मराठा महासंघ हा नेहमीच समाजाभिमुख कार्य करून समाज एकोप्याच काम मोठा निष्ठेने व कष्टाने गेल्या अनेक वर्षापासून करत असून येणा-या काळातही समाजसेवेचे काम नगदनारायणाच्या आशीर्वादाने व आपल्या मार्गदर्शनाने अविरत करत राहू असे कळवले या प्रकाशन सोहळ्याला नारायणगडाचे विश्वस्त गोवर्धन काशीद, बीड जिल्हाध्यक्ष गणेश नाईकवाडे, युवराज मातकर, आकाश नाईकवाडे, शिवाजी दिंडे, सुरज कोकाटे सह आदी उपस्थित होते

# नवी मुंबईत १९ जानेवारी रोजी रंगणार दुसरे अखिल भारतीय महिला गझल संमेलन

मुंबई, दि. २३ गझल मंथन साहित्य संस्थेतर्फे दि. १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते ६ यावळेत विष्णुदास भावे नाट्यगृह, सेक्टर -१६ अ, वाशी बस डेपो समोर, जुहू - वाशी रोड, वाशी, नवी मुंबई येथे दुसरे अखिल भारतीय महिला गझल संमेलन आयोजित करण्यात आले आहे. पहिले अखिल भारतीय महिला गझल संमेलन गेल्या वर्षी पुणे येथे पार पडले. दुसरे संमेलन नवी मुंबई येथे होत आहे. या संमेलनात संपूर्ण भारतातील गझलकारा सहभागी होऊ शकतात. आजीवन सभासदांना प्रथम प्राधान्य असणार आहे. नावनोंदणी व सहभाग निःशुल्क असेल.नावनोंदणीची शेवटची तारीख ५ जानेवारी २०२५ अशी आहे. नाव नोंदणीसाठी मुंबई जिल्हाध्यक्षा सौ. प्रणाली म्हात्रे (मो. ८७७९८७९४४६) आणि मुंबई जिल्हा सचिव सौ. सोनाली जगताप (मो. ८८५०२ ३९३१०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन गझल मंथन साहित्य संस्थेचे अध्यक्ष अनिल कांबळे, उपाध्यक्ष वसुदेव गुमटकर, सचिव जयवंत वानखडे, सहसचिव उमा पाटील, प्रसिद्धीप्रमुख भरत माळी, संमेलन समिती प्रमुख मकुंदराव जाधव, संमेलन समिती समन्वयक प्रदीप तळेकर व मुंबई जिल्हा कार्यकारिणीने केले आहे.

# ठाणे नगर वाचन मंदिरात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत प्रा. प्रज्ञा पंडित यांचे व्याख्यान

ठाणे: उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत राज्यभर १ ते १५ जानेवारी दरम्यान विविध शाळा, महाविद्यालये, आणि सार्वजनिक वाचनालयांमध्ये राबवण्यात येत असलेल्या ङ्गवाचन संकल्प महाराष्ट्राचाफ या महत्त्वाकांक्षी उपक्रमांचा ठाण्यातील शुभारंभ ठाणे नगर वाचन मंदिर या दीडशे वर्ष पूर्ण झालेल्या वाचनालयात प्रा. प्रज्ञा पंडित यांच्या व्याख्यानाने झाला. वाचनाचे



महत्त्व आणि सामाजिक तसेच व्यक्तिमत्त्व विकासातील वाचनाची भूमिका उलगडत प्रा. प्रज्ञा पंडित यांनी उपस्थितांना वाचनाचे महत्व समजावून सांगितले. तसेच वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षण कसे करावे यावरही मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थी श्रोत्यांना रुपये ८००० किमतीची पुस्तके विनामूल्य भेट दिली, संस्थेचे अध्यक्ष श्री केदार जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या व्याख्यान उपक्रमाचे उत्तम आयोजन आणि नियोजन संस्थेचे कार्यवाह सौ वीणा चव्हाण आणि हेमंतकुमार दिवेकर यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पाटील तसेच शाळेचे शिक्षक श्री सोलनकर व श्री मदगे उपस्थित होते. ङ्गवाचन संकल्प महाराष्ट्राचाफ या विषयावरील प्रा. प्रज्ञा पंडित यांचे योगदान वाचन संस्कृतीसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# अमृत योजनेअंतर्गत कल्याण-डोंबिवलीसाठी ३५७ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मान्यता

**नव्याने समाविष्ट २७ गावांना होणार सुरळीत पाणी पुरवठा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द पूर्ण केल्याची भावना**

मुंबई, दि. २: कल्याण डोंबिवली शहरासाठी अमृत योजनेअंतर्गत ३५७ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली आहे. यामुळे कल्याण डोंबिवली शहरासह नव्याने समाविष्ट २७ गावांना सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी मदत होणार आहे. याबद्दल उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.या योजनेला मान्यता मिळाल्याने उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिलेला शब्द पूर्ण केल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. अमृत अभियानांतर्गत पाणीपुरवठा, पर्जन्य जलवाहिनी, नागरी परिवहन व हरित क्षेत्र विकास इ. पायाभूत सुविधांची निर्मिती शहरांमध्ये करण्यात येत आहे. त्यानुसार कल्याण डोंबिवली शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कल्याण डोंबिवली शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुधारित तांत्रिक बदल प्रस्तावाला राज्यस्तरीय तांत्रिक समिती तसेच राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली होती. त्यास अनुसरून या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

अमृत अभियानाची प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (PDMC) असणा-या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सादर केलेल्या तांत्रिक बदलाच्या ३५७.१६ कोटी रुपयांच्या प्रकल्प किंमतीस मान्यता उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली आहे. या योजनेचा लाभ कल्याण डोंबिवली शहरासह नव्याने समाविष्ट २७ गावांना होणार आहे.

त्यामुळे सुरळीत पाणीपुरवठा होण्याबरोबरच १०५ दलघमी साठवण क्षमता देखील निर्माण होणार आहे. या योजनेला मान्यता देण्याचा शब्द उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी कल्याण-डोंबिवलीकरांना दिला होता. हा दिलेला शब्द पूर्ण केल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे.

००००

# डॉ सुशिल सातपुते यांच्या ध्यास मधील कविता या समाजभान असणा-या आहेत! ज्येष्ठ साहित्यिक प्रा.चंद्रकांतदादा वानखेडे यांचे प्रतिपादन

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)- वादळ वा-याशी झुंजणा-या व जीवनाकडे सकारात्मक दृष्टी असणा-या, कवी प्रा.डॉ. सुशिल सातपुते यांच्या मध्यासफ मधील कविता या समाजभान असणा-या आहेत, असे प्रतिपादन पुणे येथील जेष्ठ साहित्यिक प्रा चंद्रकांतदादा वानखेडे यांनी केले. नुकतेच छत्रपती संभाजीनगर येथे प्रा. डॉ. सुशील सातपुते यांच्या ध्यास कवितासंग्रहाचा प्रकाशन समारंभ व कविसंमेलन त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले तेव्हा ते बोलत होते. पुढे बोलताना प्राध्यापक वानखेडे म्हणाले की या तरुण वयात ही डॉ.सातपुते यांनी चंद्र, तारे किंवा प्रेम कवितापेक्षा देशभक्तीच्या भावना आपल्या कवितेत व्यक्त केल्या असून, सध्याच्या राजकारणाची विचित्र परिस्थिती व गढूळ होत असलेला विचार यावर अतिशय परखडपणे कविता लिहिल्या आहेत.

लातूरचे ज्येष्ठ साहित्यिक व वात्रटिकाकार भारत सातपुते यांच्या हस्ते या कवितासंग्रहाचा प्रकाशन समारंभ संपन्न झाला. यावेळी बोलताना श्री सातपुते म्हणाले की साहित्याचा वारसा मुलाकडून जपला जातोय यासारखा आयुष्यातील दुसरा आनंदाचा क्षण नाही. असेच प्रत्येकाने भौतिक गरजांच्या पाठीमागे न धावता ज्ञानाची व साहित्याची गरज समृद्ध केली पाहिजे. उत्तम साहित्य निर्मिती करायची असेल तर लेखकाने उत्तम वाचनही केले पाहिजे असे ते म्हणाले. लेखक व शेतकरी यांचे दुःख सारखे असून शेतक-यांना जसा व्यापारी लुटतो तसे लेखकांना प्रकाशक लुटतो यासाठी लेखकांनी दर्जेदार साहित्याची निर्मिती करून पुस्तकाच्या वितरणाकडेही लक्ष दिले पाहिजे असे श्री सातपुते म्हणाले.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले सुप्रसिध्द कवी, गीतकार श्री. हबीब भंडारे यांनी ध्यास मधील कविता या सतत परिवर्तनाचा ध्यास करणा-या आहेत असे सांगितले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कवी , गीतकार, संपादक श्री. गुलाबराजा फुलमाळी यांनी प्राध्यापक डॉ. सुशिल यांनी गेल्या अनेक वर्षापासून साहित्य चळवळीत आपले योगदान दिले असून त्यांच्या कविता या युवकांना दिशादर्शक आहेत. तर भाष्यकार म्हणून उपस्थित असलेल्या प्रमुख पाहुण्या व सुप्रसिद्ध कवयित्री माधुरी चौधरी यांनी हा ध्यास हे नाव समर्पक असून हा पहिलाच कवितासंग्रह असला तरी या पुस्तकात ज्या जाणिवा व्यक्त झाले आहेत ते अतिशय प्रगल्भ व समाज परिवर्तनाची आस बाळगणारे आहेत असे सांगितले. माणुसकीचा, स्वराज्याचा कविला ध्यास लागलेला आहे. यावेळी समीक्षक श्री केशव



कुकडे, मुक्त विहारी यांनीही या कविता संग्रहातील अनेक कवितावरती चर्चा करत प्रत्येक कवितेत सामाजिक संवेदना जागृत असल्याची भावना व्यक्त केली. यावेळी प्रा. डॉ. सुशील सातपुते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना माझी कवितेची नाळ अशीच भक्कम ठेवणार असून समाजातील भ्रष्टाचार , व्यसन या विरोधात जनजागृती करणार असून तरुणाईला उज्ज्वल दिशा कविता मधून देण्याचा प्रयत्न करणार आहे.

कार्यक्रमाची सुरूवात डॉ. सुशिल सातपुते यांच्या आजी - आजोबांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर कवयित्री सुनितातार्इ कपाळे यांनी मधुर आवाजात प्रार्थना सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी विजयकुमार पांचाळ यांनी केले.

यानंतर उत्साहात कविसंमेलन पार पडले. छत्रपती संभाजीनगर येथील कवी कवयित्री, विद्यार्थी यांनी विविध सामाजिक, कौटुंबिक विषयावर कविता सादर केल्या. छत्रपती संभाजीनगरच्या सी. एस. एम. एस. एस. कृषि महाविद्यालय आणि एस. टी. कर्मचारी यांच्या वतीने डॉ. सुशिल सातपुते यांचा सन्मान करत पुढील साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रकाशन सोहळा व कवी संमेलनाचे आभार कवी श्री. दिपक नागरे यांनी व्यक्त केले.ध्यास या काव्यसंग्रहाची निर्मिती लातूरच्या मांजरा प्रकाशनची आहे. प्रा. डॉ. सुशिल सातपुते हे सध्या छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था, कृषि महाविद्यालय कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे कृषिविद्या विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन कवी श्री. पंकज शिंदे यांनी केले. तसेच या कार्यक्रमासाठी कवी श्री.विजयकुमार पांचाळ, कवी .आर. पी. शिखरे, कवयित्री सुनितातार्इ कपाळे, कवी श्री. दिपक नागरे, कवी श्री. संदेश वाघमारे , मित्र परिवार, काव्यस्पंदन समूह यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी सी.एस.एम.एस.एस. कृषि महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.ए.ए.भोंडवे, प्राध्यापक, विद्यार्थी शहरातील मान्यवर, रसिक यांची उपस्थिती लाभली.

## बीडच्या पालकमंत्री पदाबाबत पक्ष श्रेष्ठी निर्णय घेतील - धनंजय मुंडे



स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येतील उर्वरित आरोपींना तातडीने अटक करून या प्रकरणाची चार्जशीट लवकरात लवकर तयार करून हे प्रकरण जलद गती न्यायालयात चालवले जावे, तसेच या घटनेतील सर्व दोषी आरोपींना फाशीची शिक्षा दिली जावी ही मागणी मी अगदी सुरुवातीपासून करत आलो आहे. या प्रकरणात आता सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन अशी तिहेरी चौकशी सुरू असून तपासाला वेग आल्याचेही दिसत आहे, असे मत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे. आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर धनंजय मुंडे हे माध्यमांशी संवाद साधत होते. हत्येतील प्रत्येक दोषी आरोपीला फासावर लटकवले जावे ही माझ्यासह सर्वपक्षीय नेत्यांची मागणी आहे. मात्र त्या आडून मला मंत्रिपदावर ठेवायचे नाही असे म्हणणाऱ्या जिल्ह्यातील काही नेत्यांना तसे का वाटते हे त्यांनाच विचारले पाहिजे, असेही धनंजय मुंडे यांनी एका प्रश्नाचे उत्तर देताना म्हटले

# जितेंद्र आव्हाडांवर गोपनीय पोलिसांची नजर, घरात घूसून शूटिंग

## आव्हाड यांनी चांगलाच संताप व्यक्त केला आहे.

**बीड,/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर ठाण्याच्या एसबी पोलीस (गोपनीय विभागची) नजर असल्याचं समोर आलं आहे. जितेंद्र आव्हाड यांची पत्रकार परिषद सुरू असताना पोलीस आव्हाडांच्या पत्रकार परिषदेमध्ये घुसले. ही पत्रकार परिषद आव्हाडांच्या घरात सुरू होती. समोर आलेल्या माहितीनुसार पोलिसांकडून पत्रकार परिषदेचं चित्रिकरण देखील करण्यात आलं आहे.आव्हाडांचा संताप

दरम्यान जितेंद्र आव्हाड यांच्या घरात पत्रकार परिषद सुरू असताना गोपनीय पोलीस आव्हाडांच्या पत्रकार परिषदेत



घुसले, त्यांच्याकडून चित्रिकरण देखील करण्यात आलं. या घटनेनंतर जितेंद्र आव्हाड यांनी चांगलाच संताप व्यक्त केला आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांवर पोलीस का वॉच ठेवत आहेत? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी उपस्थित केला आहे. पत्रकार परिषद सुरू असतानाच आव्हाड भडकले. पोलिसांनी आमच्यावर वॉच ठेवण्यापेक्षा वाल्मिक कराडवर वॉच ठेवावा असं आव्हाड यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, माझ्या खासगी घरात पत्रकार परिषद सुरू असताना पोलीस घरात का घुसले? आसा सवाल आव्हाडांकडून पोलिसांना करण्यात आला आहे. सरकारला नक्की वॉच ठेवून काय साध्य करायचे आहे? असा सवाल आव्हाड यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान यावेळी आव्हाड यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील फोन केला. जोपर्यंत वरिष्ठ पोलीस इथे येत नाही तोपर्यंत यांना सोडणार नाही, असं आव्हाड यांनी म्हटलं आहे.नेमकं काय आहे प्रकरण? जितेंद्र आव्हाड यांची पत्रकार परिषद सुरू असताना गोपनीय विभागाचे पोलीस तिथे पोहोचले, ही पत्रकार परिषद आव्हाड यांच्या घरात सुरु होती. पोलिसांकडून पत्रकार परिषदेचं चित्रिकरण देखील करण्यात आलं आहे. यावरून आता आव्हाड यांनी चांगलाच संताप व्यक्त केला आहे. माझ्या खासगी घरात पत्रकार परिषद सुरू असताना पोलीस घरात का घुसले? सरकारला नक्की वॉच ठेवून काय साध्य करायचे आहे? असा सवाल यावेळी जितेंद्र आव्हाड यांच्याकडून उपस्थित करण्यात आला आहे.

# १७ वे महात्मा फुले मराठी प्रबोधन साहित्य संमेलन खानवडी येथे संपन्न

प्रतिनिधी -जगदीप वनशिव पुणे -जिल्हातील पुरंदर तालुक्यातील क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या खानवडी गावी २१वे महात्मा फुले मराठी प्रबोधन साहित्य संमेलन मोठ्या आंनदी वातावरणात संपन्न झाले या साहित्य संमेलनाध्यक्षा मां न्यायाधीश वसंतराव पाटील यांनी भूषविले असून उद्घाटक सुरेश खोपडे पुणे जिल्हा माजी पोलीस अधिक्षक स्वागताध्यक्ष रविंद्र फुले खानवडी सरपंच निमंत्रक सुनिल तात्या धिवार अध्यक्ष बहुजन हक्क परिषद छायाताई नानगुडे सचिव महिला जिल्हा पत्रकार संघ प्रमुख पाहुणे गौरव कोलते युवा कार्यकर्ता चंद्रकांत कुजीर अध्यक्ष पुणे क्रेब्रीज शिक्षण समूह मुख्य संयोजक दशरथ यादव संजय सोनवणे दैनिक




संध्या पत्रकार अध्यक्ष भीभथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान दीपक पवार दैनिक समर्थ भारत पत्रकार से मान्यवर उपस्थित होते दीप प्रज्वलन करून महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आलासुरू झाला भिडे वाड्याचा प्रवास या गीताचा लोकार्पण सोहळा माजी पोलीस अधिक्षक सुरेश खोपडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला या गीताचे गीतकार माजी संमेलनाध्यक्ष लोककवी सीताराम नरके राष्ट्रपती पोलीस पदक मानकरी गायक छगन वाघचौरे यांनी गायिले आहेसाहित्य संमेलनातील मान्यवरांचे सत्कार करण्यात आले असून विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले परिसंवाद चर्चासत्र सूत्रसंचलन अर्चना सुतार कथाकथन अशोक उन्हाळे मंगळवेढा सूत्रसंचालन दीपक पवार यानी केले कविसंमेलानाचे अध्यक्ष डॉ लक्ष्मण हेंबाडे प्रमुख पाहुणे सुरेखा भालेराव नागटिळक लक्ष्मण शिंदे बी डी गायकवाड सीताराम नरके हे हजर होते निमंत्रित कवी चंद्रकांत जोगदंड जनाबापू पुणेकर स्वाती बंगाळे सुवर्णा वाघमारे प्रिया निप्ते सोमनाथ सुतार उमेश गोरे रमेश चव्हाण आनंद गायकवाड छगन वाघचौरे सर्व कवीनी सुंदर सुंदर रचना ग़झल अभंग प्रेम गीत शेतकरी गीत गावू रसिकांना मंत्रमुग्ध केले या कविसंमेलानाचे सूत्रसंचालन रानकवी जगदीप वनशिव यानी बहारदार दमदार पहाड़ी आवाजात शीघ्र चारोळ्या चुटके शेर शायरी आपल्या ग्रामीण भाषेत सादर करुन कविसंमेलन अविस्मरणीय रंगतदार केले

अध्यक्षिय भाषणात डॉ लक्ष्मण हेंबाडे म्हणाले कवी लेखकांनी भरपूर वाचन केले तर मराठी भाषा समृध्द होईल वाचन संस्कृती वाचवणे ही काळाची गरज आहे सहज सोप्या भाषेत मायबोलीत लिहिलेतर ग्रामीण भाषेचा संग्रह स्मरणात राहील महात्मा फुल्यांचे विचारांचे आचारण केले तर लेखनात आपली प्रगती होईल असा आशावाद मांडला

# नवीन वर्षात संकल्प करूया

नवीन वर्ष सुरू झाल्यावर प्रत्येक जण काही ना काही संकल्प करत असतो. परंतु ते संकल्प फार दिवस चालत नाही किंवा ते पूर्ण होत नाही. प्रत्येकाचे संकल्प हे वैयक्तिक आयुष्यासाठी किंवा कुटुंबासाठी असतात. परंतु देश हितासाठी संकल्प करणे अत्यंत गरजेचे आहे. तर देशासाठी आपण काहीतरी संकल्प करणे हे सुजाण नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे. जसे की, १)मी माझे सरकारी देयके वेळेवर भरेल उदा. लाईट बील, मालमत्ता कर, पाण्याचे बिल, आयकर, व्यवसाय कर आदी २) मी सर्व सरकारी नियमांचे पालन करेल. ३) मी कुठल्याही स्वरूपाचा गुन्हा करणार नाही. ४) मी वर्षभरात किमान दहा झाडे लावेल व लावलेले झाडे जगवण्याचा प्रयत्न करेल. ५) मी प्लॅस्टिकचा वापर करणार नाही. ६) मी पर्यावरणाला हानी होईल असे कृत्य करणार नाही. ७) मी कोणाशी वाद घालणार नाही व भांडण करणार नाही. ८) मी माझ्या मुलांचे शिक्षण व अभ्यास याकडे कटाक्षाने लक्ष देईल. ९) मी सोशल मीडियावर कोणाची वैयक्तिक, धार्मिक, सामाजिक व राजकीय भावना दुखावेल अशी पोस्ट करणार नाही. १०) मी सर्वांशी सौजन्याने वागेल व सर्वांना सहकार्य करेल. ११) मी माझे सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल. १२) मी कुठल्याही सरकारी कामासाठी कोणत्याही अधिकारी व कर्मचाऱ्याला लाच देणार नाही व घेणार नाही. १३) मी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करेल व दुकानातून स्वदेशी वस्तू खरेदी करेल. १४) मी कुठल्याही प्रकारचे व्यसन करणार नाही. १५) माझ्याकडून शक्य होईल तेवढी मी गरजू व्यक्तींना मदत करेल. १६) गरज नसताना कुठल्याही प्रकारची कर्ज घेणार नाही व खूपच गरज असल्यास कर्ज घेतल्यास त्याचे हप्ते वेळेवर फेडेल. १७) कुठल्याही खोट्या अफवांना बळी पडणार नाही. असे संकल्प जर प्रत्येक नागरिकांनी केले तर निश्चितच आपल्या देशाची प्रगती होईल,असे मला वाटते. उल्हास सुधीर देशपांडे छत्रपती संभाजीनगर



## रस्ता सुरक्षा सप्ताह अन् पोलीस वर्धापन दिना निमित्त जनजागृती सप्ताह

रस्ता सुरक्षा सप्ताह व पोलीस वर्धापन दिनानिमित्त जनजागृती सप्ताहचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या हस्ते आज शुक्रवारी सकाळी पोलीस मैदानावर उद्घाटन करण्यात आले. २ जानेवारी हा पोलीस स्थापना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन पोलीस वर्धापन दिन साजरा करण्यात येतो. या निमित्ताने रस्ता सुरक्षा सप्ताह आणि जनजागृती सप्ताह बीड पोलिसांनी आयोजित केला. याचे उद्घाटन पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते नवनीत कॉवत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती. त्यांना पोलीस दलाचे शस्त्र आणि विविध साधणांची माहिती देण्यात आली. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, चेतना तिडके, उपाधीक्षक उमाशंकर कस्तुरे, पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज, पांडुरंग दलाई, मारोती खेडकर, वाहतूक शाखेचे सुभाष सानप, शिवाजी बंटेवाड, शितलकुमार बल्लाळ, अनैतिक मानवी वाहतूक शाखेच्या वर्षा व्हगाडे यांची उपस्थिती होती.

## विविध महामंडळे, जिल्हा पातळीवरील कमिटी तसेच समित्यांवरती, राज्य सरकारने गुणवंत कामगारांची नियुक्ती करावी.



प्रतिनिधी ( नवी मुंबई ) सुभाष हांडे देशमुख :कोल्हापूर : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे सन १९७९ पासून मंडळाच्या नोंदीत आस्थापनेतील, समाजामध्ये व आस्थापनेमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कामगारांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने ङ्गगुणवंत कामगार कल्याण पुरस्कारङ्ग प्रदान करण्यात येतो. सदर गुणवंत कामगार हे सेवाभावी वृत्तीने कार्य करीत असल्यामुळे त्यांना, राज्यातील विविध महामंडळे, जिल्हा व स्थानिक तालुका पातळीवरील शासकीय कमिटी तसेच समित्यांवरती नियुक्ती करावी, अशी आग्रही मागणी राज्य गुणवंत कामगार असोसिएशनच्या वतीने लेखी स्वरूपात राज्य सरकारकडे करणेत आलेली आहे. हा पुरस्कार प्राप्त कामगार विविध संस्था तसेच संघटनांच्या मध्यातून तन, मन, धन अर्पून समाजातील सर्व घटकांसाठी अविरतपणे कार्य करीत असतात. शासनाने देखील त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन, जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत त्यांना वयाच्या ७० वर्षापर्यंत विशेष कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे.गुणवंत कामगारांच्या वैशिष्ट्यपूर्ण तसेच उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन, राज्यातील विविध महामंडळे, जिल्हा व स्थानिक तालुका पातळीवरील शासकीय कमिटी तसेच समित्यांवर नियुक्ती करावी, जेणेकरून त्यांच्या अनुभवाचा लाभ संबंधित महामंडळे, विविध कमिटी / समितीला होऊ शकतो. पर्यायाने राज्य सरकारचे काम अधिक सुलभ होण्यास मदतच होईल.यासाठी गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त कामगारांची राज्यातील विविध महामंडळे, जिल्हा व स्थानिक तालुका पातळीवरील विविध कमिटी / समित्यांवर नियुक्ती करण्याबाबतचे लेखी निवेदन राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगार मंत्री, कामगार राज्यमंत्री, मुख्य सचिव तसेच प्रधान सचिव यांना मेलद्वारे तसेच टपालद्वारे पाठविले असल्याचे असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश केसरकर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.यावेळी संजय सासने, अनिता काळे, संभाजी थोरात, सुभाष पाटील, महादेव चक्के, प्रविण भिके, भगवान माने आदी. उपस्थित होते.

# कवी लेखकांनी वास्तववादी लेखन केले पाहिजे -समेलनाध्यक्ष कथाकार राजेंद्र गहाळ

प्रतिनिधी-जगदीप वनशिव परभणी - येथील लोकनेते शहीद विजय वाकोडे नगरी मध्ये महात्मा फुले विद्यालय, जिंतूर रोड, परभणी येथील मराठवाडा केसरी कै. भाई अण्णासाहेब गव्हाणे सभागृहात २१वे राज्यस्तरीय अण्णाभाऊ साठे विचार साहित्य संमेलन संपन्न झाले. शहीद सोमनाथ सूर्यवंशी विचारपीठावर संपन्न झालेल्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन अण्णा भाऊ साठे यांचे नातू सचिन साठे यांच्या शुभहस्ते झाले. तर संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ग्रामीण कथाकार राजेंद्र गहाळ होते. संमेलनाचे स्वागताध्यक्ष युवा नेते अजयराव गव्हाणे, तर प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार अँड विजयराव गव्हाणे साहेब, आ. डॉ. रत्नाकर गुट्टे, जेष्ठ विधिज्ञ आदरणीय अँड अशोक सोनी, सुप्रसिद्ध साहित्यिक देविदास फुलारी, शंकर वाडेवाले, प्रा. महेश मोरे, प्रा. राम कटारे धनेगावकर, सौ. गिताजंलीताई गव्हाणे, सतीश कावडे, अमोल रणखांब सचिन देशमुख पीएन रणखांब संदीप मोटेगावकर अण्णासाहेब मुळे गजानन वैरागड के के भारसाकळे, विठ्ठल सातपुते, प्रा. नारायण शिंदे माजी संमेलन अध्यक्ष कादंबरीकार बाबा कोटंबे संतोष नारायणकर, प्राचार्य तुळशीराम वानरे लखनसिंह जाधव, ज्ञानेश्वर शिंदे, रमेश नाईकवाडे, कैलास लोनसने, सौ. पंचशीला लहाने, सौ. उषाताई सुतार, गुलाबराव हरकळ, प्रदीप चव्हाण, आदींची उपस्थिती



होती. उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन कॉम्रेड अविनाश मोरे यांनी तर आभार संयोजक कॉम्रेड गणपत विषयी यांनी मानले बस स्थानकाजवळ असलेल्या अण्णाभाऊ साठे यांच्यापुतळ्यापासून संमेलन स्थळापर्यत सकाळी ग्रंथ दिंडी काढण्यात आली. तरुण वर्ग वाचनाकडे वळविण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्नाची गरज आहे असे स्वागताध्यक्ष अजयराव गव्हाणे म्हणाले. अण्णाभाऊंच्या विचार साहित्यात समाज बदलाची ताकद आहे उद्घाटक सचिन साठे म्हणाले. मातंग समाजाच्या विकासासाठी गाव तिथे समाज मंदिर उभारण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही से म्हणाले आमदार डॉ रत्नाकर गुट्टे म्हणाले. अण्णाभाऊचे साहित्य जर का तुमच्या घरात सापडले तर देशद्रोही ठरवल्या जाईल याप्रसंगी माजी आमदार विजयराव गव्हाणे म्हणाले. सर्वांना संधी निर्माण करून देण्यासाठी नाकारण्याची तयारी ठेवावी लागेल डॉ. दयाराम मस्के यांनी याविषयी विचार मांडले. अध्यक्षिय भाषणात राजेंद्र गहाळ म्हणाले माणसाला जीवन जगण्यासाठी अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजा मिळायला पाहिजे देशातील ग्रामीण भागात माणसाच्या अद्याप या तीनही गरजा भागलेल्या नाहीत. अलीकडे माणुसकीचा ओलावा कमी होऊ लागला आहे माणूस स्वार्थामागे धावू लागला. प्रेमाची नाती सोडून स्त्री भ्रूणहत्या, वृद्धाश्रमाची वाढती संख्या, हुंड्यासाठी स्त्रियांचा होणारा छळ, तरुण वर्गात वाढती व्यसनाधीनता, नापिकीमुळे कर्जापाई शेतकरी आत्महत्या कवी पत्रकार लेखकांनी सशक्त ताकतीने मांडली पाहिजे.आज संपूर्ण देश एका विचित्र अवस्थेतून जात आहे. आद्यपुरुषाचा विसर पडलेला असावा. त्यामुळे कवी लेखकानी महापुरुषांच्या साहित्याची व विचाराची बैठक पक्की करून आधुनिक जगातील मूल्यधिष्ठीत साहित्य निर्माण करणे काळाची गरज आहे म्हणून लेखकानी वास्तववादी साहित्य लिहिले पाहिजे असे प्रतिपादन केले तर निमंत्रिताच्या कविसंमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक देविदास फुलारी होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ सुरेश हिवाळे यांनी केले कवी संमेलनात कवी म्हणून सहभागी कवी शंकर वाडेवाले, दिगंबर कदम, डॉ. नवनाथ सिंगापुरे, प्रा. आत्माराम राजेगोरे, प्रा. व्यंकटेश सोळंके, विठ्ठल सातपुते, गझलकार अरविंद सगर, मोहन कुलकर्णी, राजेश रेवले, गझलकार केशव कुकडे, प्रा. राम कटारे धनेगावकर, उत्तम अवचार, दत्ता वालेकर, अँड शंकर कदम, पांडुरंग वाघातकर, अमोल विनायक देशमुख, दी. फ. लोंढे, दत्ता वालेकर, बबन आव्हाड, जानकाबाई वावळे,,सय्यद चांद तरोडेकर, सोपान डोके, चारा आघाडे, आदी कवींनी सामाजिक विषयाच्या कविता सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कवी संमेलनाचे आभार प्रदीप चव्हाण यांनी मांडले साहित्य संमेलनास कवी, लेखक, विचारवंत, कलावंत, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, परभणी शहरातील समस्त रसिक श्रोत्यांची लक्षणीय उपस्थिती होती. संमेलन यशस्वी करण्यासाठी मुख्य संयोजक कॉम्रेड गणपत भिसे, महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी,शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी, सजन समितीचे उत्तम गोरे प्रकाश बनपट्टे जितेंद्र गायकवाड अशोक उबाळे एल डी कदम दत्ता तांबे कोंडीबा जाधव प्रकाश गायकवाड सिद्धांत भिसे गजानन कसबे आर्दीनी परिश्रम घेतले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com